**किरकोळ फौ.क्रं. २०९/२०१९**
**तसिना—वि—अंशल**
**नि.क्र. ५७ व ८६ पुढे**

**अर्जदार साक्षीदार क्रं.१ यांचा उलटतपास गैरअर्जदार यांचे विधीज्ञ श्री. एस.आर थोरात याांचेमार्फत शपथेवर सुरू...**

२४. हे म्हणणे खरे नाही की माझे साखरपुडयामध्ये संपुर्ण रुपये ४,००,०००/— खर्च माझे वडिलांनी केला होता हे दर्शविण्याकरिता माझेकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. माझे चावरा मॅट्रीमोनीयलची प्रोपाईल मी प्रकरणात दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की मी माझे चावरी मॅट्रीमोनीयल मधील प्रोपाईल मध्ये मी मॉयक्रोसॉप्ट कंपनीमध्ये काम करित आहे असे नमुद केले होते. हे म्हणणे खरे आहे की माझे साखरपुडा झाल्यानंतर मी गैरअर्जदारासोबत धार्मिक कार्यक्रम करिता कोट्टा थैंसुर येथे गेले होते. हे म्हणणे खरे आहे की माझा साखरपुडा झाल्यानंतर मी गैरअर्जदारसोबत फोनवर बोलत होते. हे म्हणणे खरे आहे की साखरपुडयानंतर व लग्नाचे पुर्वी माझे व गैरअर्जदार सोबत खुप प्रेम होते. हे म्हणणे खरे नाही की लग्नापुर्वी अंशाल कोणताही मानसिक आजार नव्हता.

२५. हे म्हणणे खरे आहे की माझे व गैरअर्जदाराचे लग्न हे एकमेकांचे संमतीने झालेले अरेजं मॅरेज आहे. हे म्हणणे खरे नाही की लग्नापुर्वी गैरअर्जदार व त्याचे आईवडिलांनी माझेवर कोणत्याही अटी टाकल्या नव्हत्या. लग्नापुर्वी गैरअर्जदाराने माझेवर हुंडयाची अट टाकली होती व मी काम सोडु नये हीसुध्दा अट ठेवली होती.सदरच्या अटी गैरअर्जदार याने साखरपुडा झाल्यांनतर टाकले असल्यामुळे मी त्यांना नकार देवु शकली नाही.हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदाराने माझेवर कोणत्याही प्रकारच्या अटी टाकल्या नव्हत्या. सदरचे प्रकरण दाखल करण्यापुर्वी गैरअर्जदार हे हुंडा मागत आहे याबद्दल कुठेही तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की लग्नापुर्वी दागदागिने व इतर साहित्य खरेदी साहित्य माझे परिवारसोबत गैरअर्जदार व त्याचे परिवारसुध्दा होते. हे म्हणणे खरे नाही की माझे लग्नाचा संपुर्ण खर्च रुपये ५,००,०००/— माझे वडिलांनी केले होते हे दर्शविण्याकरिता माझेकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

**२६.** हे म्हणणे खरे नाही की मी लग्नापुर्वी रात्रीचे पाळीवर काम करित होते. हे म्हणणे खरे नाही की लग्नाचा पुर्ण खर्च गैरअर्जदार व त्याचे परिवाराने केला होता. हे म्हणणे खरे नाही की माझे लग्नानंतर मी व गैरअर्जदार जेव्हा हनीमुनला गेले होते तेव्हा त्याचा संपुर्ण खर्च गैरअर्जदाराने केला होता. हे म्हणणे खरे नाही की लग्नानंतर लगेच मी गैरअर्जदार याला पुणे येथे घेवुन आले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगते की गैरअर्जदार यांनी स्वतः मला पुणे येथे आणले होते कारण पुणे येथे त्यांची जॉब होती. लग्नानंतर मी माझे आईवडिल यांचे चिचंवड येथील घरात राहण्याकरिता आले होते. हे म्हणणे खरे नाही की माझे लग्नानंतर माझा पगार व बॅकेचे सर्व व्यवहार माझे वडिल पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार याने मला पैसे देण्यासाठी त्रास दिला नाही तसेच माझा पगार त्याचे वडिलांनी देण्यासाठी कधीच मला निर्देश दिला नाही.

**२७.** हे म्हणणे खरे नाही की मी गर्भवती झाले त्यावेळी गैरअर्जदार हे आनंदी झाले व मला मदत करीत होते. हे म्हणणे खरे नाही की मी काम करणारी महिला असल्याचे व माझे कामचे भविष्य पाहुन मला मुलबाळ नको होते. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा मी गर्भवती होती तेव्हासुध्दा मी कामावर जात होती. हे म्हणणे खरे आहे की मी गर्भवती असतांना सुध्दा कामावर रात्रीचे पाळीवर जात होते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार यांने माझी तब्येत चांगली रहावी म्हणुन मी गर्भवती असतांना नोकरी सोडण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी गर्भवती असतांना गैरअर्जदार हा मला घरगुती कामामध्ये मदत करित होता व जेवण बनवित होता. हे म्हणणे खरे नाही की मी गर्भवती असतांना गैरअर्जदारासोबत फिरण्याकरिता लोणावळा येथे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की मी गर्भवती असतांना गैरअर्जदार कडे न राहता माझे आई वडिलांकडे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की माझे लग्नानंतर गैरअर्जदार क्रं. ३ ला ब्रेन टयुमरचा आजार होता. गैरअर्जदार क्रं. ३ हे उपचाराकरिता कोची जात असत. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदार क्रं. १ ला कोची येथे जाण्यास थांबविले होते त्यामुळे गैरअर्जदार क्रं. ३ चा उपचार पुणे येथे करावा लागला. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार क्रं. ३ ही त्याच्या उपचाराकरिता पुणे येथे आले होते. हे म्हणणे खरे नाही की मला गैरअर्जदार क्रं. १ चे आईवडिलांनी सोबत राहायचे नव्हते त्यामुळे नारयल तेलाचे

आजार असल्याबद्दल सांगत होते. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा गैरअर्जदार क्रं. १ हा कामानिमीत्ताने युएसएला गेले होते तेव्हा मी माझे आईवडिलांकडे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की माझे प्रसूतीचे वेळेस गैरअर्जदार हा माझेसोबत उपस्थित होता. हे म्हणणे खरे नाही की मला जे बाळ जन्माला आले होते तो जन्मापासुन चांगला होता.

**अर्जदार साक्षीदार क्रं. १ यांचा गैरअर्जदारातर्फे उलटतपास गैरअर्जदार यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकुब.**

**उलटतपास तहकुब.**

—समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.09.24 17:35:40 +0530

**( अल अमुदी ए.के. )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**पिंपरी, पुणे.**
**दि.२४.०९.२०२५**

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.09.24 17:35:43 +0530

**( अल अमुदी ए.के. )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**पिंपरी, पुणे.**

**प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती किर्ती उदय पवार

न्यायालयाचे नांव : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे.

न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक :२४/०९/२०२५

न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक :२४/०९/२०२५

पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक :२४/०९/२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखक(श्रेणी–iii)